सकाळ अॅग्रोवन
शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५

# हळदीवरील पाने गुंडाळणारी अळी, खोडकिड्याचे नियंत्रण

डॉ. मनोज माळी, डॉ. सचिन महाजन,
डॉ. हर्षवर्धन मरकड

सद्यःस्थितीत हळद पिकावर पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी, कंदमाशी, सूत्रकृमी, खोडकिडा आदी किडींचा प्रादुर्भाव वाढण्यासाठी पोषक हवामान स्थिती निर्माण झाली आहे. या काळात हळद पिकावर किडींचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पिकावर परिणाम होऊन एकूण उत्पन्नात मोठी घट येण्याची शक्यता असते. त्यासाठी प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून त्वरित कीड नियंत्रणासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.


पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव.

## पाने गुंडाळणारी अळी

**प्रादुर्भावाची अवस्था :** अळी

**नुकसान प्रकार :**

- या किडीचा प्रादुर्भाव साधारणपणे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होऊन नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत दिसून येतो.
- हळद पिकामध्ये या किडीच्या अंडी, अळी आणि कोष अवस्था या अनुक्रमे ४ ते ५, १३ ते २५ आणि ६ ते ७ दिवस असतात. प्रौढ पतंग मध्यम आकाराचा असून पंख काळसर तपकिरी रंगाचे असतात. पंखावर मोठा पांढरा ठिपका असतो.
- पूर्ण वाढलेली अळी २.५ ते ३.७ सें.मी. लांब व हिरव्या रंगाची असते. कोष फिक्कट हिरवा असतो.
- किडीची अळी पाने गुंडाळून त्यात लपून राहून पाने खातात. पूर्ण वाढ झालेली अळी पानाच्या गुंडाळीतच कोषावस्थेत जाते.

**नियंत्रण**

- किडीच्या पानांवरील अळ्या व कोष अवस्था वेचून नष्ट कराव्यात.
- अळीने गुंडाळलेली पाने खोडून गोळा करून अळीसह नष्ट करावीत.

**रासायनिक फवारणी (प्रतिलिटर पाणी)**

- क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि

(अॅग्रेस्को शिफारस)

## सूत्रकृमी

ही कीड अतिशय सूक्ष्म असून, डोळ्यांना दिसत नाही. सूत्रकृमी हळदीच्या मुळांवर गाठी तयार करतात. जमिनीत मुळाभोवती राहून सुईसारख्या अवयवाने मुळातील रस शोषून घेते. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते. फुटव्यांचे प्रमाण कमी होते. प्रादुर्भाव झाल्यानंतर प्रथम पिकाचा शेंडा मलूल होऊन पीक पिवळे पडून झाड मरते. कालांतराने ही कीड हळदीच्या कंदामध्ये प्रवेश करून कंद सडविण्याचे काम करते. सडलेले कंद तपकिरी रंगाचे दिसतात. सूत्रकृमीमुळे झालेल्या कंदावरील जखमांतून रोगकारक बुरशी कंदात प्रवेश करता. त्यामुळे हळद पीक कंदकूज रोगाला बळी पडते.

**नियंत्रण**

- सूत्रकृमीच्या व्यवस्थापनाकरिता जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा प्लस पावडर २ किलो प्रति एकरी २५० किलो शेणखतामध्ये मिसळून वापर करावा.
- भरणी करताना निंबोळी पेंड ८ क्विंटल प्रति एकर या प्रमाणात वापर करावा.
- सूत्रकृमीच्या व्यवस्थापनाकरिता हळद पिकात झेंडू महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यासाठी हळद पिकात सापळा पीक म्हणून झेंडू लागवड करावी.

## खोडकिडा

**प्रादुर्भावाची अवस्था :** अळी

**ओळख :**

- या किडीचा पतंग आकाराने लहान व नारंगी रंगाचा असतो. दोन्ही पंखावर काळ्या रंगांचे ठिपके असतात.
- खोडकिडीचा प्रौढ, मादी व पतंग हळदीच्या कोवळ्या पानांवर अंडी घालतात.
- अळी लालसर रंगाची असून पूर्ण शरीरावर काळे ठिपके असतात. प्रौढ पतंग मध्यम आकाराचे असून पंखावर लहान काळे ठिपके आढळतात. हळद पिकाच्या सुयोग्य वाढीच्या काळात या किडीचा उपद्रव दिसून येतो.

**नुकसान**

- अंड्यातून बाहेर आलेली अळी प्रथमतः पानांच्या कडेचे हरितद्रव्य फस्त करते.
- अळी खोड व हळदीचे कंद पोखरते. खोडाला छिद्र करून आत शिरते व आतील भाग खाते.
- पिकाच्या खोडावर पडलेले छिद्र हे खोडामध्ये अळी जिवंत असल्याचे लक्षण आहे.
- खोडकिडाग्रस्त हळद पिकाचे मध्यभागातील पान पिवळे पडलेले दिसते. कालांतराने खोड वाळायला सुरुवात होते.

**नियंत्रण**

- प्रादुर्भावीत झाडे उपटून, गोळा करून तत्काळ नष्ट करावीत.
- निंबोळी तेल ५ मिलि प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गरजेनुसार १५ दिवसांनी दुसरी फवारणी घ्यावी.
- हळद लागवडीमध्ये एकरी १ या प्रमाणे प्रकाश सापळ्यांचा वापर करावा. प्रकाश सापळा रात्री ७ ते १० या वेळेत चालू ठेवावा. यामध्ये किडीचे प्रौढ आकर्षित होतात. त्यांना नष्ट करावे.
- हळद पिकात लागवडीनंतर ४० आणि ९० दिवसांच्या अंतराने महानीम (मेलीया डुबीया) किंवा घाणेरी (लॅंटेना कॅमेरा) या वनस्पतींच्या पानांचे २ टन प्रति एकर प्रमाणे आच्छादन केल्यास खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.
- किडीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास, क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार फवारणी करावी. (अॅग्रेस्को शिफारस)
- निसर्गतः आढळणाऱ्या अनेक मित्र किडींद्वारे खोडकिडीच्या अळीचे नियंत्रण होत असते. अशावेळी मित्रकिडींचे निरीक्षण करूनच रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करावी.

- डॉ. मनोज माळी, ९४०३७ ७३६१४ डॉ. सचिन महाजन (रोगशास्त्रज्ञ) ९४२११ २८३३३
(लेखक हळद संशोधन योजना, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे कार्यरत आहेत.)